# कृष्ण

कृष्ण माझा सखा, कृष्ण माझा भ्राता,
असे म्हणतोय आम्ही युगानुयुगे,
पण तू खरंच आहेस आमच्या पाठीमागे?

जगात होत आहेत अनन्वित अत्याचार,
युद्धामुळे आम्ही झालोय बेजार,
रोगाच्या साथीने मरत आहेत माणसे,
तुझ्या अस्तित्वालाच आव्हान केले आहे जसे.

आज रामाने जन्म घ्यायची गरज आहे,
कृष्णाच्या लिलांची गरज आहे,
जगाला बुद्धाच्या शिकवणूकीची गरज आहे,
तू जगाला तुझे अस्तित्व दाखवून द्यायची गरज आहे.

अस्तित्व दाखव नाहीतर पापी होतील शिरजोर,
का अजून संपलाच नाही संकटांचा डोंगर?
अस्तित्व दाखव नाहीतर मान्य कर,
मी पण मानवाइतकाच कमजोर.

मला खात्री आहे, तू नक्की अवतार घेशील,
जगामधल्या वाईटाचा नाश करशील,
परत एकदा सत्ययुग उजाडेल,
आणि जगात सुखशांती नांदेल.
आणि जगात सुखशांती नांदेल.



श्रीमती अंजली चौबळ
सुरुचि, कोथरूड, पुणे
9881891452

व्हिडिओ पहा